महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६१ वा | दिनांक : २४/०३/२०२५ | वार : सोमवार

## भाजपचे लोकं मृतांनाही सोडत नाही, त्याचंही राजकारण करतात - संजय राऊत





औरंगजेबाची कबर ही मराठ्याच्या पराक्रमाचे स्मारक आहे. ज्या तैमूरलंग सर्वात जास्त हत्या केल्या, मंदिर तोडली त्यांच्या नावावर एक अभिनेता आपल्या मुलाचे नाव ठेवतो, आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांचे कौतुक करतात, तैमूर कहा है, कैसा है विचारतात, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. तर भाजपच्या हिंदुत्ववादी लोकांना तैमुर चालतोय.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, देशात औरंगजेबाच्या कबरीचे जसे राजकारण सुरू आहे तसे मृतांचे राजकारण सुरू आहे, भाजपचे लोकं मृतांनाही सोडत नाही, त्याचंही राजकारण करतात. अभिनेता सुशांत सिंग राजपुतने आत्महत्याच केली होती, असा क्लोजर रिपोर्ट सीबीआयने मुंबईतील विशेष न्यायालयात सादर केला आहे. सुशांत सिंह राजपूत व दिशा सालियान या दोघांच्या आत्महत्येवरून भाजप व सत्ताधाऱ्यांनी राजकारण केले. त्यावर बोलताना संजय राऊत यांनी सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली.

संजय राऊत म्हणाले की, नारायण राणेंना अटक झाली होती तेव्हा त्यांच्या घरच्यांनी उद्धव ठाकरेंना फोन केले होते. नारायण राणे यांना जेव्हा अटक केली तेव्हा त्यांच्यासाठी त्यांच्या कुटुंबातून उद्धव ठाकरेंना फोन आले होते की जरा त्यांना सांभाळून घ्या, त्यांची प्रकृती बरी नाही. त्यानंतर संध्याकाळी उद्धव ठाकरेंनी पोलिसांना सूचना देऊन त्यांना सोडायला सांगितलं. त्यांच्यासाठी केंद्रातून फोन आले. त्यासंदर्भात अमित शहा यांनी उद्धव ठाकरेंना फोन केला होता ते आमचे केंद्रीय मंत्री आहेत त्यांना सांभाळून घ्या. आता या गोष्टी काढायच्या असतात का. पण तुम्ही काढल्यामुळे हे आम्हाला सांगावं लागत आहे. हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी कबर खोदायला सांगितली नाही. त्यांनी शहराचे नाव बदलून एका झटक्यात संभाजीनगर केले. त्यासाठी काही अध्यादेश काढा, असे काही म्हटले नाही. याला हिंदुत्व म्हणतात.

संजय राऊत म्हणाले की, औरंगजेब हा क्रूर होताच. त्याने त्याचा बाप, भाऊ यांना तुरूंगात डांबले अथवा खतम केले. ब्रिटिश शासनकर्ते सुद्धा क्रूरच होते. मोगलांच्या खुणा आपण नष्ट करत आहोत, पण ब्रिटिशांच्या खुणा जतन करून ठेवल्या आहेत. लालकृष्ण अडवाणी यांची स्थिती पाहिल्यावर अनेकांना कैद झालेल्या शहाजहानची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

संजय राऊत म्हणाले की, भाजपाचे लोक मृतांनाही सोडत नाहीत. चांगल्या घरातील लोक मृत पावल्यानंतर दुर्देव असतं, मात्र त्याचंही राजकारण करतात. त्या बदनामीत अनेक चांगल्या घरातील लोकांवर चिखल फेकून बदनाम करण्याचं अलीकडचं राजकारण भाजपाने सुरु केले आहे. सगळ्यांना आता त्रास होत आहे, पण भाजपाचा हेतू साध्य होत नाही. ठाकरे, अनिल परब आणि आमच्यासारखे लोक ठामपणे लढत उभे आहेत.

## सुशांत मृत्यू प्रकरणी रियाला क्लीन चिट



१४ जून २०२० रोजी अभिनेता सुशांत सिंग राजपूतचा मृतदेह त्याच्या वांद्रे येथील घरात आढळला. या प्रकरणात पोलिसांनी त्याची कथित प्रेयसी रिया चक्रवर्तीला ताब्यात घेतले होते. सुशांत सिंग राजपूतला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप तिच्यावर होता. सुशांतच्या मृत्यूच्या ४ वर्षे आणि ६ महिन्यांनंतर आता सीबीआयने या प्रकरणाचा अंतिम अहवाल दिला आहे. सीबीआयला त्यांच्या तपासात असे आढळून आले की सुशांतला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याबद्दल कोणतेही पुरावे सापडले नाहीत. आता रिया चक्रवर्तीचा भाऊ शोविकने न्याय मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

शोविकने त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवरून त्याची बहीण रियासोबतचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. या ब्लॅक अँड व्हाईट व्हिडिओसोबत त्याने लिहिले आहे - सत्यमेव जयते.

२५ जुलै २०२० रोजी, सुशांत सिंग राजपूतच्या मृत्यूनंतर सुमारे दीड महिन्यांनंतर, त्याचे वडील के.के. सिंह यांनी पाटणा येथे तक्रार दाखल केली होती. तक्रारीत त्यांनी रिया चक्रवर्तीवर सुशांतला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप केला होता. तक्रारीनुसार, सुशांतने त्याच्या मृत्यूच्या काही काळापूर्वी त्याच्या बहिणीला फोन करून सांगितले होते की, रियाने त्याचे वैद्यकीय अहवाल सार्वजनिक करून त्याला वेडा सिद्ध करण्याची धमकी दिली आहे. सुशांतने त्याच्या बहिणीला सांगितले होते की त्याला भीती आहे की रिया त्याला त्याच्या माजी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणात अडकवेल. तक्रारीत असेही म्हटले आहे की सुशांतच्या मृत्यूच्या एक दिवस आधी रिया त्याचे वैद्यकीय अहवाल घेऊन निघून गेली होती.

या प्रकरणाच्या तपासादरम्यान, कलाकारांकडून मनी लॉंड्रिंग आणि ड्रग्ज वापराची माहिती देखील आढळून आली. मनी लॉंड्रिंग प्रकरणात ७ ऑगस्ट २०२० रोजी अंमलबजावणी संचालनालयाने रिया चक्रवर्ती आणि तिचा भाऊ शोविक यांची चौकशी केली. दुसरीकडे, रिया आणि तिच्या भावाला ८ सप्टेंबर रोजी ड्रग्ज प्रकरणात नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने अटक केली. रिया आणि शोविक यांच्यातील चॅटवर अटकेचा आधार होता, ज्यामध्ये त्यांनी ड्रग्ज खरेदी आणि पुरवठा केल्याचा उल्लेख केला होता. सुमारे २७ दिवस पोलिस कोठडीत राहिल्यानंतर, रिया चक्रवर्तीला ७ ऑक्टोबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मिळाला. तर शौविकला ड्रग्ज प्रकरणात ३ महिने तुरुंगात राहावे लागले.

## मनसेमध्ये मोठे फेरबदल, अमित ठाकरेंवर मोठी जबाबदारी

**मुंबई** : आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्ष संघटनेत अनेक बदल केले आहेत. रविवारी रवींद्र नाट्यमंदिरात राज ठाकरे यांच्या उपस्थितीत मनसेची बैठक पार पडली. राज ठाकरे यांनी मनसेमधील नवीन संघटनात्मक बदल आणि रचना आज जाहीर केले आहेत. मनसेने पहिल्यांदाच मुंबईसाठी अध्यक्षपदाची नेमणूक केली असून संदीप देशपांडे यांच्याकडे ती जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तर राजपुत्र अमित ठाकरे यांच्यावरही मोठी जबाबदारी दिली असून मनसेच्या सर्व शाखाध्यक्षांची जबाबदारी त्यांच्याकडे दिली आहे. फक्त विभाग अध्यक्ष असलेल्या मनसेमध्ये आता शहर अध्यक्ष आणि उप-शहर अध्यक्ष या नव्या पदांची निर्मिती करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकीत मनसेला मोठे अपयश आले होते. त्यांचा एकही आमदार निवडून आला नाी. या अपयशानंतर पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी पक्ष संघटनेत मोठे बदल करण्याचे संकेल दिले होते. त्यासाठी त्यांनी पक्षातील पदांचे पुनर्गठन, पदाधिकाऱ्यांची आचारसंहिता आणि इतर महत्त्वाचे मुद्दे यावर विचार करून आराखडा तयार करण्यास सुरुवात केली होती. त्यानुसार आज मनसेच्या प्रमुख नेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत केंद्रीय समिती स्थापनेसह, मुंबईत महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी पक्षाला मजबूत कसे करावे, यावर सखोल चर्चा करण्यात आली.

काय करायचे, कसे करायचे त्याची आखणी 2 एप्रिल पर्यंत सर्वांना मिळेल. शहर रचनेत कामांची रचना आहे काय करायचे आणि काय नाही करायचे, हे सांगितले जाईल, असे राज ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. ज्याला जे काम दिले त्यांनी तेच करायचे. त्यामुळे भांडणे कमी होतील, अशा सूचना राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या. अनेक गोष्टी साचल्या आहेत. ते सर्व गुढीपाडवा मेळाव्यात बोलेन, असेही राज ठाकरे यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ मार्च २०२५


## "लाडका भाऊ" योजना अंतर्गत बेरोजगार तरुणांचा आक्रोश

**भंडारा (एम. वी. बनसोडे) :** विधानसभा निवडणुकीपूर्वी गाजलेली "लाडका भाऊ" योजना अंतर्गत भंडारा जिल्ह्यातील 1000 हून अधिक युवक-युवतींना रोजगाराच्या संधी मिळाल्या होत्या. मात्र आता अवघ्या 6 महिन्यांतच हे सर्व तरुण पुन्हा बेरोजगार झाले असून, त्यांच्या भविष्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.या संदर्भात एका शिक्षित तरुणीने कौशल्य विकास कार्यालयातील अधिकारी श्री. झलके यांना साधा प्रश्न विचारला की, पुन्हा नियुक्तीची शक्यता आहे का किंवा शासनाकडून काही नवीन आदेश (जी.आर.) आले आहेत का?परंतु, यावर श्री. झलके यांनी "तुला आत येण्याची परवानगी कोणी दिली? तू कोण आहेस जो मला जाब विचारतोस?" असे उद्विग्न आणि अपमानास्पद वक्तव्य करत तीव्र शब्दात ओरडले. ही वागणूक एका सामान्य नागरिकासाठी अत्यंत अपमानजनक आणि मनस्तापकारक ठरली आहे.असाच प्रकार जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथेही घडल्याचे समोर आले असून, योजनेअंतर्गत प्रश्न विचारणाऱ्या तरुणींना उत्तर देण्याऐवजी अपमानजनक वागणूक दिली जात आहे.ही केवळ प्रशासनाची निष्काळजीपणाची झलक नसून, थेट मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. तरुणाईच्या अपेक्षा आणि भविष्याशी खेळ करत असलेल्या यंत्रणेवर राज्य शासनाने त्वरित कारवाई करणे गरजेचे आहे, अशी मागणी आता जोर धरत आहे. "शासनाने जेव्हा निवडणुकीपूर्वी आश्वासन देऊन रोजगार दिला, तेव्हा तो फक्त प्रचाराचा भाग नव्हता, तर त्या तरुणांचे स्वप्न होते. आता तेच स्वप्न चुरगळले जात असून, त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात आहे, हे दुर्दैवी आहे," अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्यांनी दिली आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, तसेच तरुणाईसाठी स्थायी रोजगाराचा मार्ग शासनाने मोकळा करावा, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संघटना यांचे पदाधिकारी श्री धनंजय आचार्य यांनी केली आहे.

## अंढेरा पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्याच्या गाडीला अवैध दारू विक्रेत्याने लाथ मारल्यामुळे, एका पोलीस कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू ,तर दुसरा जखमी



**चिखली (महेश मुंढे) :** चिखली तालुक्यातील शेळगाव आटोळ ते मिसळवाडी यांच्यामध्ये ही दुर्दैवी घटना २३ मार्च दुपारी दीड वाजेच्या सुमारास घडली. प्राप्त माहिती नुसार अंढेरा पोलीस स्टेशनचे राम आंधळे आणि भागवत गीरी हे पोलीस कर्मचारी दुचाकीने शेळगाव हॉटेल ते मिसळवाडी परिसरात पेट्रोलिंग करत होते. अवैध्य दारू विक्रेता शिवणकर नामक अवैध दारू वाहतूक करणारा अवैध दारूचे बॉक्स घेऊन शेळगाव आटोळे येत होता ही माहिती अंढेरा पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना मिळाल्यानंतर या दोन पोलीस कर्मचाऱ्यांनी पाठलाग करून त्याला पकडण्याचा जोरदार प्रयत्न केला. मात्र अवैध दारू वाहतूक करणारा शिवणकर हा दुचाकी वर एकटाच समोर दारूचे बॉक्स घेऊन जात होता. पाठलाग करत असतानाच अवेद्य दारू वाहतूक करणाऱ्याने पोलीस कर्मचाऱ्यांच्या दुचाकी लाथ मारली, त्यामुळे दुचाकी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला जोरदार धडकली .त्यातच दुचाकी चालवणारे भागवत गिरी पोलीस कर्मचारी यांचा जागीच मृत्यू झाला. पोलीस कर्मचारी राम आंधळे हे गंभीर जखमी झाले. घटनास्थळावर जवळून कृष्णा मिसाळ जात असताना त्यांनी तात्काळ विलंब न करता जखमी पोलीस कर्मचारी कृष्णा मिसाळ यानी चिखली येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तोपर्यंत अवैध दारू वाहतूक करणारा घटनास्थळावरून त्याने पोबारा केला, पसार झाला. घटनेची माहिती मिळताच अंढेरा पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळावर पोहोचले. या घटनेवरून अवैध दारू विक्रेत्यांची चांगलीच हिम्मत वाढलेली दिसते. आतातरी संपूर्ण अवैध्य दारू विक्रेत्यावर कडक कारवाई करावी अशी जनतेमध्ये चर्चा होत आहे.

## बी.एस्सी ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी प्रवेश सुरू

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ब्लॉकचेन टेक्नॉलॉजीच्या पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ च्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून २०२४-२०२५ च्या शैक्षणिक वर्षामध्ये या अभ्यासक्रमाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता यावर्षीही प्रवेश क्षमता वेळे आधीच पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लवकर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरावेत असे आवाहन विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केले आहे. प्रवेशासाठी अंतिम मुदत ३० एप्रिल, २०२५ पर्यंत असल्याचे विद्यापीठामार्फत सांगण्यात आले आहे.

ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी मध्ये पदवी अभ्यासक्रम सुरु करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे देशातील पहिले राज्य विद्यापीठ आहे. देशात आणि जगभरात नवनवीन तंत्रज्ञानाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानातील करिअरच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थी आणि पालकांनी या अभ्यासक्रमाला पहिल्याच वर्षी उस्फूर्त प्रतिसाद दिला होता. सध्या विविध क्षेत्रामध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. सर्वच क्षेत्रात पारदर्शकता, डेटा सुरक्षेसाठी या तंत्रज्ञानाला सक्षम पर्याय म्हणून पाहिले जात आहे. जगभरात डेटा सिक्युरिटीसाठी वाढत असलेली ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची मागणी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या हेतूने या अभ्यासक्रमाला मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

## विभागीय आयुक्तांनी साधला अंबाळा येथील आदिवासी बांधवांशी संवाद



**कन्नड (अरुण थोरात)** छ.संभाजीनगर चे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दुर्गम भागातील शंभर टक्के आदिवासी असलेल्या अंबाळा ता.कन्नड गावास दि. २२ मार्च रोजी भेट देऊण दोन तास संवाद साधलादुर्गम अंबाळा गावात एखाद्या वरिष्ठ अधिकार्याने भेट देण्याची ही पहिलीच वेळ होती. बैठकीत आदिवासी बांधवांनी आपल्या समस्या मांडल्या परंतु उत्तरे व उपायोजना करण्यासाठी तहसिलदार, गटविकास अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, जलजिवन मिशन चे अधिकारीच उपस्थित नसल्याने आयुक्तांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. या अधिकार्यांनी कार्यालयात बसून राहणे बंद करुण गावोगावी जाऊन फीरा, या लोकांचे प्रश्न न सुटल्यास बिडीओ, तहसिलदार यांना नोटीस काढणार असल्याचे सांगितले, अंबाळा ग्रामस्थांनी रस्ता, प्रलंबित वनहक्क दावे, जलजिवन मिशन पाणी पुरवठा योजना, मुलांचे शिक्षण, शाळेस संरक्षण भींत, ग्रामविकास, जन्मप्रमाणपत्र, बिबट्या कडून पाळीव जनावरांच्या शिकारी, आदीं बाबत समस्या मांडल्या, अंबाळा येथील जलजिवन मिशन योजने अंतर्गत जलवाहिनी च्या कामास वन्यजीव विभाग परवानगी देत नसल्याने काम खोळंबल्याचे चे ग्रामस्थांनी सांगीतले, त्यावर उत्तर देण्यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री शिंदे गैरहजर असल्यामुळे आयुक्तांनी संताप व्यक्त केला. वनपाल के.एम. पठाण यांना ही याबाबत समाधानकारक उत्तर न देता आल्यामुळे आयुक्तांनी, वन विभागाचे डिएफओ श्री नाईकवाडे व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकारी यांना दुरध्वनी वरुण विचारणा केली. दोघांची ही एकमेकां वरती जबाबदारी ढकला ढकली बद्दल नाराजी व्यक्त करुण आपसात संवाद साधून काम करण्याची सुचना दिली. आदिवासी प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी आदिवासी जल जंगल जमिनीची काळजी घेतात जंगलांशी नाते घट्ट करण्यासाठी वनहक्क कायदा असल्याचे नमूद केले, आदिवासी विकास विभागा मार्फत बिरसा मुंडा योजनेतून स्मशानभूमी, वनपट्टयातील आदिवासी शेतकऱ्यांना विहिर व इतर कामांसाठी मदत करण्यात येईल असे अश्वासन दिले. आदिवासी बांधवांनी आपल्या मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण द्यावे, यासाठी आश्रमशाळा , वसतीगृहांत मुलांना पाठविण्याचे अवाहन केले, यावेळी नायब तहसिलदार दिलीप सोनावणे, मंडळ अधिकारी रमेश चव्हाण, विस्तार अधिकारी श्री दारकुंडे, समाज कल्याण चे श्री पिसे, श्री कायंदे, वनहक्क शाखेचे अभिजीत पानठ, ग्रामसेवक श्री शेख, सरपंच सखाराम भुतांबरे, रावजी पथवे, दिनकर दाभाडे, रतन मधे, बाळू मेंगाळ, जयराम पथवे, हरिश थोरात, अरुण थोरात, गंगाराम अगिवले, शिक्षक कल्याण पवार, ज्ञानेश्वर वाघ, बुधा गावंडे, भावराव मेंगाळ आदींसह शेकडो आदिवासी बांधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ मार्च २०२५


## 'क्रिकेट महोत्सव' - पोलिस व नागरिकांमधील विश्वास वृद्धीचा अनोखा उपक्रम



**भंडारा (एम. वी. बनसोडे) :** पोलिस विभागाच्या वतीने 'भंडारा पोलिस क्रिकेट लीग (BPCL)' या नावाने २७, २८ आणि २९ मार्च रोजी तीन दिवसीय क्रिकेट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन पोलिस अधीक्षक नूरूल हसन यांच्या मार्गदर्शनाखाली केले जात आहे.या लीगमध्ये भंडारा जिल्ह्यातील सर्व १६ पोलिस स्टेशनचे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, प्रत्येक संघात ५ ते ८ खेळाडू हे सामाजिक पदाधिकारी तसेच सामान्य नागरिक असणार आहेत. या उपक्रमामागील उद्देश म्हणजे पोलिस विभाग आणि समाजातील नागरिकांमध्ये आपलेपणा, समन्वय आणि विश्वास वाढवणे. "पोलिस खात्याविषयी जनतेचा विश्वास अधिक दृढ व्हावा, तसेच एक सकारात्मक संवाद निर्माण व्हावा, हा या लीगचा मुख्य उद्देश आहे," असे पोलिस अधीक्षक नूरूल हसन यांनी सांगितले.सामाजिक सलोखा आणि सहभागाची भावना जोपासणारा हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक अनुकरणीय उदाहरण ठरू शकतो. या क्रिकेट लीगमुळे पोलिस आणि नागरिक एकत्र खेळत, हसत-गप्पा मारत, सहकार्याची नवी नाती निर्माण करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## 'खोक्या'च्या समर्थनार्थ तुळजापुरात रास्ता रोको



**तुळजापुर :** भाजपचे आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता सतीश भोसले उर्फ खोक्यासाठी आदिवासी समाज आक्रमक झाला आहे. खोक्याच्या समर्थनासाठी आज तुळजापुरात आदिवासी समाजाकडून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सतीश भोसलेची चुकीची प्रतिमा तयार केल्याचा आरोप करत त्याच्या कुटुंबीयांच्या समर्थनार्थ आदिवासी समाजाने हे रास्ता रोको आंदोलन केले. सतीश भोसले खोक्या नाही तर आमचा विठ्ठल, असे म्हणत मित्रांच्या हातावर विठ्ठल नावाचे टॅटू काढल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. या रास्ता रोकोमुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे.

काही दिवसांपूर्वी सतीश भोसलेचे मारहाण करतानाचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. यानंतर एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर खोक्या भाई फरार झाला होता. पोलिसांनी त्याला प्रयागराजमधून अटक केली. तसेच वन विभागाने त्याचे राहते घर जमीनदोस्त केले. सतीश भोसलेचे घर वन खात्याच्या जमिनीवर असल्याचे सांगत ही कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर काही अज्ञातांनी त्याच्या घरातील वस्तूंना आग लावली. त्याशिवाय काही महिलांना मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या कारवाईच्या विरोधात खोक्याची पत्नी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणावर बसली आहे. खोक्या भोसलेला आणि त्याच्या कुटुंबीयांच्या समर्थनार्थ आदिवासी समाज आज तुळजापुरात रस्त्यावर उतरला आहे.

आदिवासी समाजाने केलेल्या या रास्ता रोकोला दलित पँथरनेही सक्रिय पाठिंबा दर्शवला आहे. तुळजापूर-सोलापूर महामार्ग, तुळजापूर-धाराशिव महामार्ग आणि इतर प्रमुख मार्ग अडवून समाजाच्या कार्यकर्त्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, सतीश भोसलेचा जातीवाचक उल्लेख करणाऱ्यांवर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा तसेच सतीश भोसले यांच्या कुटुंबीयांवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी या आंदोलकांनी केली आहे. राजकीय उट्टे काढण्यासाठी सतीश भोसलेला टार्गेट केल्याचा आरोपही आदिवासी समाजातून करण्यात आला आहे.सतीश भोसले खोक्या नाही तर आमचा विठ्ठल आहे, असे समाजबांधवांकडून म्हटले जात आहे. त्याच्या मित्रांच्या हातावर विठ्ठल नावाचे टॅटू आहे. सतीश भोसलेची चुकीची प्रतिमा तयार केल्याचा आरोप आंदोलकांकडून करण्यात येत आहे.वन विभागाच्या कारवाई विरोधात सतीश भोसलेची पत्नी पाच दिवसांपासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसली आहे. या उपोषणाकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. तसेच, खोक्याच्या मोडलेल्या घराची नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करत राजकीय नेत्यांच्या संघर्षात पारधी समाजाच्या कार्यकर्त्यांना बळी पडू दिले जाणार नाही, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर आदिवासी समाज रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा दिला आहे. समाजाच्या मागण्यांकडे लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असाही इशारा आदिवासी समाजाने दिला आहे.

## छत्रपतींच्या खऱ्या विचारांसाठी



छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने
सगळेच जण राजकारण करतात
त्यांचे कार्य,कर्तृत्व अन् विचार मात्र
सारेच जण विसरतात

आज जिकडे तिकडे विषमता
त्याची थोडीही लाज नाही आम्हा
शिवबांचे राज्य होते समतेचे
मग त्याला जाती धर्माचे गालबोट का लावताहेत

छत्रपतींचा खरा इतिहास दडपून टाकला
खोटा इतिहास लिहिला अन् शिकवला
जे खरे शिवबांचे शत्रू
त्यांच्याच दावणीला तुम्ही आज दिसताहेत

विविध जाती-धर्माला जोडून
शिवबांनी जे सुराज्य निर्माण केलं
सत्तेसाठी लालसी तुम्ही
पेशव्यांच्या तळपायाशी लोळताहेत

जिजाऊंचा,शिवबांचा अन् संभाजी राजेंचा
इथे जाणुन बुजुन अपमान केला जातो
इतके षंड का झालो आम्ही ?
तरीही आम्हाला राग येत नाही

अरे, सत्ता काय
आज असते, उद्या नसते
तुमच्या गद्दारीमुळे
छत्रपतींना बदनाम होऊ देऊ नका

मराठ्यांनो, ते राज्याभिषेक नाकारणारे
छत्रपतींना कधीच झाले नाहीत
ते तुम्हाला तरी काय होणार ?
तुम्ही छत्रपतींना तरी बेईमान होऊ नका

मराठ्यांनो, छत्रपतींच्या कार्यामुळे
आम्हा अठरा पगड जातींना अभिमान आहे
तुम्ही ब्राह्मण्यत्वाच्या नादी लागला
म्हणून तुमच्या आमच्यात थोडा दुरावा आहे

छत्रपतींच्या दोन दोन जयंत्या
तुम्हाला काहीच वाटत नाही
ज्यांनी ज्यांनी छत्रपतींना छळले
त्यांच्याविरुद्ध तुमचे रक्त पेटत नाही

सर्वांना जोडणारा, पुढे घेऊन जाणारा
छत्रपतींचा सर्वधर्मसमभावाचा विचार
त्याची मुद्दामहून आज पायमल्ली केली जाते
तरीही तुम्हाला त्याचे काहीच वाटत नाही

सत्ता मिळवण्याच्या तडजोडीसाठी
जोडलेल्या जाती धर्माला तोडू नका
छत्रपतींना ज्यांनी ज्यांनी छळले
तो खरा इतिहास कधी विसरू नका

छत्रपतींच्या खऱ्या विचारासाठी
मराठ्यांनो, आपण सारे जागे होऊ या
बदनामी अन् खोटा इतिहास सांगणारांना
छत्रपतींचे शौर्य, मानवता अन् एकात्मता शिकऊया


**प्रा. डॉ. सतीश मस्के**
**मो.९४२३३९७४८४**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ मार्च २०२५

# कृषीच्या बळावर वाशिमची नवी ओळख घडवण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा संकल्प



**वाशिम (महेश मुंढे) :** एस्पिरेशनल ते इन्स्पिरेशनल होकृषीच्या बळावर वाशिमची नवी ओळख घडवण्याचा संकल्प जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी व्यक्त केला. वाशिम जिल्ह्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान आणि पौष्टिक तृणधान्य योजना अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय शेतमाल विक्री महोत्सवाला आजपासून स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र, काटा रोड येथे सुरुवात झाली. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी यांच्याहस्ते या दोनदिवसीय महोत्सवाचे थाटात उद्घाटन झाले. यावेळी श्रीमती बुवनेश्वरी बोलत होत्या. यावेळी कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह, आत्माच्या प्रकल्प संचालक अनिसा महाबळे आणि कृषी उपसंचालक अजय मोरे, हिना शेख उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, जिल्हा कृषी विकास अधिकारी अभिजीत देवगिरकर, कृषी विज्ञान केंद्र करडाचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आर. एल. काळे, केवीकेचे शास्त्रज्ञ डी.डी.गीते, रेशीम विकास अधिकारी सुनील फडके यांच्यासह सर्व तालुका कृषी अधिकारी, यांची प्रमुख उपस्थिती होती. आज दि.२२ मार्च रोजी पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांचा उत्साह आणि ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

उद्घाटनप्रसंगी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी म्हणाल्या, "निती आयोगाने वाशिमला 'ऍस्पिरेशनल डिस्ट्रिक्ट' म्हणून घोषित केले आहे. पण आम्ही कृषी उत्पादनाच्या माध्यमातून ही ओळख पुसून जिल्ह्याला 'इन्स्पिरेशनल डिस्ट्रिक्ट' बनवण्याचा निर्धार केला आहे. गेल्या दोन वर्षांत चिया लागवडीचे क्षेत्र १०० हेक्टरवरून ३ हजार ६०० हेक्टरपर्यंत वाढले आहे. आज वाशिम चिया लागवडीत देशात प्रथम क्रमांकावर आहे, हे आमच्यासाठी अभिमानास्पद आहे. यासाठी कृषी विभाग, शेतकरी बांधव आणि खरेदीदार कंपन्या अभिनंदनास पात्र आहेत." त्यांनी पुढे सांगितले, "शेतकऱ्यांना कमी पाण्यात चांगले पीक आणि योग्य मोबदला मिळावा, यासाठी नावीन्यपूर्ण पिकांची लागवड पुढेही सुरू राहील. हा महोत्सव शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणारा ठरणार आहे. सर्वांनी याचा लाभ घ्यावा.

जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करताना कृषी सहसंचालक श्री.लहाळे म्हणाले, "श्रीमती बुवनेश्वरी एस यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष आणि कौशल्यपूर्ण जिल्हाधिकारी मिळणे हे वाशिमचे भाग्य आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळवून देण्यासाठी इतके प्रयत्न करणारे अधिकारी दुर्मीळ असतात. त्यांच्या नेतृत्वाखाली वाशिम जिल्हा कृषी क्षेत्रात नवी उंची गाठत आहे. चिया लागवडीतील यश हे त्यांच्याच दूरदृष्टीचे फळ आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह म्हणाले, "चिया पिकाची संकल्पना जिल्हाधिकारी यांचीच आहे. कमी पाणी, कमी मेहनत आणि जास्त उत्पन्न हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून ही संकल्पना प्रत्यक्षात आणली गेली. अवघ्या दोन वर्षांत वाशिम देशात चिया उत्पादनात प्रथम क्रमांकावर पोहोचला आहे. या महोत्सवासाठी सर्व कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. जिल्हाधिकारी केवळ महसूलच नव्हे, तर सर्व विभागांचे, विशेषतः कृषी विभागाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या परिश्रमामुळे वाशिमला राज्यात नवी ओळख मिळत आहे."या महोत्सवात शेतकऱ्यांनी ग्राहकांना थेट धान्य, फळे, भाजीपाला यांसारखी ताजी उत्पादने विक्रीस उपलब्ध करून दिली. सेंद्रिय उत्पादनांचे स्वतंत्र दालन, बचत गटांचे विक्री दालन, कृषी प्रक्रिया उत्पादनांचे दालन आणि खवय्यांसाठी खाद्य पदार्थांचे विशेष दालन अशी वैविध्यपूर्ण व्यवस्था होती. १५० स्टॉल्सवर शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी बचत गट आणि महिला बचत गटांनी आपली उत्पादने मांडली होती. चिया पिकांसाठी खरेदीदार-विक्रेता संमेलन आयोजित करण्यात आले, ज्यात राज्यातील आणि राज्याबाहेरील खरेदीदारांनी सहभाग घेतला.जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी महोत्सवाला भेट देत सर्व स्टॉल्सना प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी शेतमाल विक्रेते, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि उद्योजकांशी संवाद साधला. शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पादनांबाबत, सेंद्रिय शेतीबाबत आणि बाजारपेठेतील मागणीबाबत माहिती घेतली. त्यांच्या या भेटीमुळे शेतकऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला. "शेतकऱ्यांचे अनुभव ऐकणे आणि त्यांच्या गरजा समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा, हाच आमचा प्रयत्न आहे," असे त्यांनी शेतकऱ्यांशी बोलताना सांगितले. शेतकऱ्यांनी पूर्वीच्या तुलनेत चियाची अधिक दराने विक्री केल्याने बाजारावर चांगला परिणाम झाला आहे. वाशिम जिल्ह्यात चिया लागवडीच्या यशामुळे आणि वाढीमुळे ते खूप आनंदी आहेत. कर्नाटक येथील चिया उत्पादनापेक्षा वाशिमचे उत्पादन जास्त आहे. या यशामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली आहे. वाशिम जिल्ह्यातील कृषी विभाग शेतकऱ्यांना लागवडीसाठी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करत आहे. दि. २३ मार्च रोजी इतर शेतमालासाठी खरेदीदार-विक्रेता संमेलन होणार असून, पिकानिहाय खरेदीदारांशी सामंजस्य करार केले जाणार आहेत. वाशिम जिल्हा आणि शहरातील नागरिक, शेतकरी आणि ग्राहकांनी या महोत्सवाला मोठ्या संख्येने हजेरी लावली. "हा महोत्सव शेतकऱ्यांसाठी एक मोठी संधी आहे. आम्हाला ताजी आणि दर्जेदार उत्पादने मिळाली," अशी प्रतिक्रिया एका ग्राहकाने दिली. हा महोत्सव २३ मार्चपर्यंत सुरू राहणार असून, सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. वाशिम जिल्हा आता कृषी क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत आहे. चिया लागवडीतील यश आणि शेतकऱ्यांचा उत्साह यामुळे हा जिल्हा देशभरात चर्चेत आला आहे. 'वाशिम शेती शिल्प' ब्रँडच्या लोगोचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाला कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक, शेतकरी, व्यावसायिक, खरेदीदार आदी उपस्थित होते. संचालन हिना शेख व गोपाल मुठाळ यांनी केले.आभार संतोष वाळके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002